
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# माझ्या ओळखीतले बाळासाहेब वाघ



**कर्मवीर बाळासाहेब वाघ यांची शनिवारी (दि.१९) ९२ वी जयंती साजरी होत आहे. यानिमित्ताने त्यांच्या जीवनकार्यावर टाकलेला प्रकाशझोत.**

कै. बाळासाहेबांचा व माझा संबंध तसा अलीकडचा. जानेवारी १९९६ मध्ये महाराष्ट्र शासनाने पाण्याच्या संदर्भात केलेल्या कामगिरीचा आढावा घेऊन भविष्याची पुनर्बांधणी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाची स्थापना केली. या आयोगाचे अध्यक्ष म्हणून डॉ. माधवराव चितळे यांची निवड केली गेली. या आयोगात सचिव म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली. याच आयोगावर कै. बाळासाहेब वाघ यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली होती. चार-साडेचार वर्षांच्या या कालावधीत कै. बाळासाहेबांचा सहवास लाभला व त्यातून स्नेह व आपलेपणा निर्माण झाला.

पुणे येथील कृषी महाविद्यालयात त्यांचे शिक्षण पूर्ण झाले. १९५०-५५ च्या दरम्यान त्यांनी कृषी शास्त्राची पदवी धारण केली असावी. त्यावेळची शिक्षण गुणवत्ता पाहता त्यांनी घेतलेल्या त्या काळाची बी. एस्सी (कृषी) पदवी आत्ताच्या डॉक्टरेट या पदवीच्याही पुढे जाते. पांढरा पायजमा, घोळ नेहरू शर्ट व डोक्यावर पांढरी गांधी टोपी, पायात कातडी चपला असा त्यांचा पोषाख मी त्यांच्याशी ओळख झाल्यापासून पाहत होतो. त्यांच्या वागणुकीत कसलाही कृत्रिमपणा नव्हता. राजकारणापासून चार पावले दूर राहण्याचा त्यांचा स्वभाव.

नाशिक येथील आग्रा रोडवरील कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेची उभारणी, येथील वैभव त्यांच्या कार्याची साक्ष देते. या ठिकाणी बाळासाहेबांचे कार्यालयवजा घर होते. दररोज रात्री नऊ वाजता ते निफाडजवळील भाऊसाहेबनगर येथे राहत्या घरी मुक्कामाला जात असत. कधीही सुटी नाही, आळस नाही. एखाद्या गुणी विद्यार्थ्याप्रमाणे ते रात्री नऊपर्यंत वयाच्या ९० वर्षांपर्यंत संस्थेच्या कामात मग्न असलेले मी पाहत आलो. या शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष झालेला आपण पाहत आहोत. अभियांत्रिकी, कृषी व इतर आनुषंगिक विषयाला वाहून घेतलेल्या शाळा, महाविद्यालये संस्थेमार्फत चालविल्या जातात.

महाराष्ट्रात गेल्या वीस वर्षांच्या काळात खासगी क्षेत्राने शिक्षणाला आपल्या विळख्यात घेतले आहे. अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन, संगणक, इत्यादी शाखेमध्ये उच्च पदवीधारक निर्माण करण्यासाठी खासगी व्यवस्था पुढे आली आहे. यातून आपण गुणवान व बुद्धिमान पिढी निर्माण करू शकू का याचे उत्तर काळच देणार आहे. या पिढीच्या निर्मितीसाठी तितक्याच मोठ्या संख्येने निष्णात, उच्चविद्याविभूषित आणि अनुभवी शिक्षकांची, प्राध्यापकांची फळी उभी करावी लागणार आहे, हे नजरेआड करून चालणार नाही. ज्यांनी हे वेळीच ओळखले ते तरतील व जे हे ओळखण्यात कमी पडतील ते काळाच्या ओघात संपतील. असे होऊ नये म्हणून बाळासाहेबांची धडपड वाखाणण्यासारखी होती. त्यांच्या संस्थेतील शिक्षक, प्राध्यापक वृंद हा उच्च शिक्षण घेतलेला, हुशार गुणवान होण्यासाठी, तसेच त्याला घडविण्यासाठी सातत्याने ते प्रयत्न करीत राहिले. इतर संस्थांनी अनुकरण करावे असे उपक्रम ते नेहमीच राबवत आले.

ग्रामीण भागावर त्यांचे विशेष प्रेम होते. मुलींनी शिकले पाहिजे. पदवीधर, पदव्युत्तर झालं पाहिजे म्हणजे त्यांना शिकलेले नवरे मिळतील, पुढची पिढी चांगली निर्माण होईल अशा तऱ्हेने ग्रामीण भागाचे सबलीकरण होईल, यावर त्यांचा विश्वास होता. यात ग्रामीण मुलींनी मागे पडावयास नको म्हणून शैक्षणिक संस्थांनी मुलींना शिक्षण देण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सुविधा पुरविल्या पाहिजे, याबद्दल ते आग्रहाने भूमिका मांडत असत. शंभर शिकणाऱ्या मुलातून दहाएक मुले महाविद्यालयात जातात. त्यापैकी ४ विज्ञान शाखेकडे वळतात आणि उर्वरित बहुतांश कला शाखेकडे जातात. येणारे युग हे विज्ञानाचे युग आहे. ज्ञानाचे युग आहे. ४ मुले देशाची, समाजाची गरज कशा प्रकारे भागवतील, यावर गांभीर्याने विचार करावयास पाहिजे, असे ते म्हणत असत. ग्रामीण भागाचा विकास पाण्याशी जोडलेला आहे. या पाण्याचे संधारण करण्यासाठी शेतकऱ्यांनी, कृषी उद्योगांनी शक्ती पणाला लावली पाहिजे आणि पाण्याचे शेतीच्या माध्यमातून संपत्तीत रूपांतरण करण्याचं कसब अंगी आणलं पाहिजे, हा विचार ते कृतीत आणण्याचा प्रयत्न करीत असत. ग्रामीण भागाचा विकास झाला पाहिजे यासाठी लोकचळवळ निर्माण झाली पाहिजे. लोकांचे शिक्षण झाले पाहिजे. रिकाम्यापोटी करमणूक ही अनाठायी वाटते आणि असे होऊ नये म्हणून साहित्य परिषदेच्या धर्तीवर सिंचन परिषदा मोठ्या स्वरूपात घडवून आणण्यात त्यांनी हिरिरीने भाग घेतला, सहकार्य केले, आर्थिक मदत केली. जानेवारी २००६ ची नाशिक येथील सिंचन परिषद हे त्याचेच फलित आहे, असे ठामपणे सांगावेसे वाटते.

**- डॉ. दि. मा. मोरे, पुणे**

Nashik Edition
Oct 18, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com